आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना केंद्र शासनाच्या Grant in aid to Tribal Research Institute या योजनेखाली सन २०१४-१५ चे प्राप्त केंद्रीय सहाय्य वितरीत करण्याबाबत. **(२२२५ १८६७)**

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१५/प्र.क्र.०८/कार्यासन.६

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख:- २१ जानेवारी, २०१६.

<u>वाचा -</u>

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८२/अर्थ-३, दि.३०.३.२०१५.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं २०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.४.२०१५.
३) केंद्र शासनाचे क्र. ११०२४/१७ /२०१४/Research , दिनांक ०५-०२-२०१५.
४) केंद्र शासनाचे क्र. ११०२४/१९ /२०१५-Research , दिनांक १९-११-२०१५
५) आदिवासी विकास विभागाची नस्ती क्र. आवि वि- २०१५/ प्र.क्र.८०/कार्या-०५.

शासन निर्णय-

केंद्र शासनाच्या Grant in aid to Tribal Research Institute या योजनेखाली मागणी क्र.टी-५, २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०२- अनुसूचित जमातीचे कल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०२) नियोजन व संनियंत्रण शाखा -जनजाती संशोधन व प्रशिक्षण संस्था (केंद्रीय हिस्सा) २२२५ १८६७ या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वर्षात रु. २००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित आहे.

केंद्र शासनाच्या Grant in aid to Tribal REsearch Institute या योजनेखाली सन २०१४-१५ करिता उपलब्ध केलेला रु. ५८.१० लक्ष इतका निधी या विभागास सन २०१४-१५ हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर प्राप्त झाल्यामुळे तो खर्च करण्यात आला नव्हता. सदर निधी सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पिय तरतूदीमधून खर्च करण्यास संदर्भाधीन क्रमांक ५ येथील नस्तीस वित्त विभागाने व वाचा क्र. ४ नुसार केंद्र शासनाने सहमती दिली आहे. यामुळे Grant in aid to Tribal Research Institute या योजनेखाली **(केंद्रीय हिस्सा) (२२२५ १८६७) ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वर्षात अर्थसंकल्पित रु. ५८.१० लक्ष (रुपये अठ्ठावन्न लक्ष दहा हजार फक्त) निधी** या योजनेचे नियंत्रक अधिकारी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना खर्चासाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. **उपरोक्त वितरीत केलेला निधी या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत करण्याची तसेच त्यानुषंगाने निधी खर्च करण्यासंबंधीच्या नियमांचे पालन करण्याची दक्षता नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.**

३. सदर वितरीत निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) खर्चासाठी नियंत्रक अधिकारी यांना सुपूर्द करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी वितरित निधीच्या मर्यादेत व वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०१५/ प्र. क्र. ८५ /अर्थ-३, दिनांक १७-०४-२०१५ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- २०१५/ प्र.क्र. ३४ / कोषा. प्रशा. ५, दि. २४-०७-२०१५ मधील अटी व शर्तींची पुर्तता करण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर शासनादेश **वाचा** येथील क्रमांक ५ मधील नस्तीत वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेच्या अनौ.संदर्भ क्रमांक २४४/व्यय-१४, दि. २५/०८/१५ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201601181608582624 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhagwan Maruti Sawant

Digitally signed by Bhagwan Maruti Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bc0bdf8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, cn=Bhagwan Maruti Sawant
Date: 2016.01.21 12:57:34 +05'30'

भगवान सावंत
अवर सचिव.

प्रत,

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
२. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग.
४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. अवर सचिव, कार्यासन-०५, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.